## ॥ श्री ॥
## ॥ बाबा ॥

अमृताचे पुत्र आम्ही
जीवनदायी पेय जे
आहे त्रिभुवनी दुर्मिळ जे
मिळते वांगणीत अतुल ते ॥धृ॥

या अमृताने दृष्टही तरले
सोडून वाईट कर्मा रे
नास्तिक ते ही आस्तिक बनले
केवळ अविट मधुरपणाने
चाखाया त्याची गोडी रे
लागते पूर्वजन्मी पुण्य रे ॥1॥

अमृताचे पुत्र आम्ही
शूर सरदार मावळे
पाहू नका वाईट नजरेने
होईल शॉर्ट सर्कीट रे
आहोत आम्ही निर्भिड रे
अमृत भिनते नसानसांतूनी ॥2॥

एकदा घेईल चव जो त्याची
तो होई बाबा वेडा रे
वाटे प्यावे नित्य निरंतर
आहे जे क्षितिजा एवढे
आहोत आम्ही भाग्यवान अमृत लाभले बाबारुपे
नाही त्याचा अभिमान रे,
गर्व आहे अमाप रे ॥3॥

★★★★★